# शास्त्रशाळांच्या निर्मितीसाठी नेमके कोणते काम करायचे आहे

विविध विषयातील तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली गटागटाने त्या त्या विषयाची शास्त्रशाळा उभी करण्यासाठी विकासपथ तयार करण्याचे कार्य करावयाचे आहे. विकासपथ तयार करताना,

१. सोप्याकडून कठीणाकडे आव्हानात्मक पावले टाकणे,

२. व्यक्तिगत नि सांघिक शिक्षणाचे भाग हेरणे,

३. अस्तित्वात असलेल्या साधनांचा उपयोग करणे आणि नवीन साधनांचा शोध घेणे,

४. विविधांगी बौद्धिक खाद्य पुरविणारे, विकासपथावर स्थान असणारे असे उपक्रम निश्चित करणे,

५. त्या त्या साधनांच्या नि उपक्रमांच्या मागची शास्त्रीय तत्वे त्या त्या ठिकाणी स्पष्ट करणे,

६. अपेक्षित अडचणींची यादी करणे, त्यांच्या सोडवणुकीची दिशा देवून ठेवणे.

७. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे स्वरूप, कालावधी इ. ठरविणे.

८. प्रत्येक पायरीचे फल निश्चित करणे.

९. नित्य मूल्य मापनाचे नोंदी, आराखडे ठरविणे.

१०. मूल्यमापनाची पद्धती ठरविणे.

११. इतर विषयांच्या विकासपंथांशी असलेले समस्तरीय नाते शोधणे.

१२. अनेक शास्त्रशाळेतील विशिष्ट भागाचे परस्परांशी समन्वय साधणारे असे विषय प्रकल्प पद्धतीने अभ्यासण्यासाठी निवडणे.

ही दिशादर्शक बाराखडी आहे.

❖